




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १५६ ●शुक्रवार, दि. ०५ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# कामगारांसाठी महत्वाची बातमी ! 9 तासांऐवजी 12 तास काम करावे लागणार, सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

महायुती सरकारने कामगार कायद्यात मोठा बदल केला आहे. बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत लरलळपशीं ाशशींळपस कारखाने अधिनियम १९४८ आणि आस्थापन अधिनियम ात सुधारणा मंजूर करण्यात आल्या. या बदलानुसार, आता कारखान्यातील कामगारांना दिवसाला ९ ऐवजी थेट १२ तास काम करावे लागणार आहे. तर दुकाने आणि आस्थापनांम धील कामाचे तास ९ वरून १० तासांपर्यंत वाढवले आहेत.

या निर्णयामुळे औद्योगिक क्षेत्राला industrial area जास्तीच्या मागणीच्या काळात कामगारांच्या workers कमतरतेचा प्रश्न सुटेल, असा दावा सरकारकडून करण्यात आला आहे. मात्र, कामगार संघटनांनी श्ररलीी ींपिळेप याला तीव्र विरोध दर्शवला असून, हा निर्णय श्रमिकांच्या आरोग्यासाठी व जीवनमानासाठी घातक ठरणार असल्याची टीका केली आहे.

सरकारचे म्हणणे आहे की वाढीव वेळेसाठी काम करणाऱ्या कामगारांना वेतनाच्या दुप्पट दराने मोबदला मिळणार आहे. यामुळे बेकायदेशीररीत्या काम करून घेण्यावर आळा बसेल. ओव्हरटाईमची overtime मर्यादा वाढवली गेल्याने काम गारांना कायदेशीर संरक्षण मिळेल,



असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. तसेच, कामगारांना विश्रांतीसाठी ब्रेकमध्ये बदल करण्यात आले असून, आधीचा ५ तास ३० मिनिटांऐवजी आता ६ तास ३० मिनिटांनी विश्रांती मिळणार आहे. ही सुधारणा फक्त २० किंवा त्यापेक्षा जास्त काम गार असलेल्या आस्थापनांवर लागू होणार आहे. २० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापनांना नोंदी प्रमाणपत्र घेण्याची सक्ती राहणार नाही, मात्र सूचनापत्र देणे आवश्यक असेल.

कामगार संघटनांचे म्हणणे आहे की सरकारने हा निर्णय उद्योगपतींच्या दबावाखाली घेतला असून, कामगारांच्या हिताकडे दुर्लक्ष केले आहे. १२ तासांची शिफ्ट हा निर्णय प्रत्यक्षात आरोग्याला अपायकारक आणि कौटुंबिक आयुष्य विस्कळीत करणारा ठरेल, असा आरोप करण्यात येतो आहे. महत्त्वाचे म्हणजे, नव्या नियमांनुसारही कारखान्यातील कामगारांसाठी आठवड्याची ४८ तासांची मर्यादा कायम राहील. म्हणजेच एका आठवड्यात सरासरी ८ तासच काम बंधनकारक असेल. जर एखाद्या दिवशी कामगाराने १२ तास काम केले, तर त्याला ओव्हरटाईमचा मोबदला द्यावा लागेल. याशिवाय, त्याला एक बदली रजा देणेही आवश्यक असेल.

# उपोषणानंतर जरांगेंची प्रकृती बिघडली!

## विखेंनी रुग्णालयात जाऊन घेतली भेट

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर छत्रपती संभाजीनगरमधील रुग्णालयाम ध्ये उपचार सुरु आहेत. पाच दिवसांच्या उपोषणानंतर त्यांची प्रकृती खालावली आहे. दरम्यान, आज मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांची रुग्णालयात भेट घेतली. कामानिमित्त आलो होतो म्हणून जरांगे पाटील यांच्या तब्बेतीची चिंता होती, त्यामुळं त्यांची भेट घेतल्याची माहिती त्यांनी दिली.



त्यांनी काळजी घ्यावी ही विनंती केली. कारण समाजाची काळजी सरकार घेत असल्याचे विखे पाटील म्हणाले.

प्रामाणिक भावनेने जे जे आवश्यक आहे ते सर्व केले- मराठा आरक्षणाच्या संदर्भात काढलेल्या जीआरबाबत संभ्रम आहे. याबाबत विचारले असता विखे पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जबाबदारी दिल्यानंतर प्रामाणिक भावनेने जे जे आवश्यक आहे ते सर्व केले आहे. तरी पण काही लोक घरी बसून त्यावर टीका टिप्पणी करत असल्याची टीका विखे पाटलांनी केली. पब्लिकमध्ये जाऊन


▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठा आणि कुणबी समाजाचा ऐतिहासिक संबंध असल्याचं सातारा गॅझेटियरमधून स्पष्ट

**मुंबई । प्रतिनिधी**

सातारा गॅझेटियर हा एक जुना सरकारी दाखला / किंवा दस्तऐवज आहे. ब्रिटिश काळात (१८२०-१८३० च्या सुमारास) सातारा प्रांतात जमिनी, शेती, कुळी, जाती, पिकं, महसूल या सगळ्याची नोंद करून जी कागदपत्रं तयार झाली, त्याला सातारा गॅझेटियर म्हटलं जातं. यात गावनिहाय वंशावळी, कुळाच्या नोंदी, जात नोंदी यांचा समावेश आहे.

मराठा आणि कुणबी या समाजांचा ऐतिहासिक संबंध असल्याचा दाखला या दस्तऐवजातून मिळतो. सातारा गॅझेटियरमध्ये जात नोंदी, वंशावळी नोंदी असल्याने त्यामध्ये कुणबी, कुणबी मराठा आणि मराठा कुणबी अशा नोंदी सापडतात. मराठा समाजाचा पायाभूत व्यवसाय शेती आहे हे या सरकारी


MAHARASHTRA STATE GAZETTEERS

SATARA DISTRICT

नोंदीतून दिसून येतं. त्यामुळे मराठा आणि कुणबी एकच असल्याचा दावाही मजबूत होतो.

मराठा समाज आरक्षणासाठी प्रयत्न करत असताना ही नोंद महत्त्वाची ठरते. कारण कुणबी समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण आहे. जर ऐतिहासिक पुराव्यांमधून मराठा समाजाचाही उगम कुणबीमध्येच असल्याचं सिद्ध झालं, तर मराठा समाजालाही ओबीसी प्रवर्गात सामावून घेण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. ब्रिटिश सरकारला महसूल आणि कर आकारणीसाठी जमीन, लोकसंख्येची नोंद तयार करायची होती. म्हणूनच सातारा गॅझेटियर तयार करण्यात आलं. याचा मूळ उद्देश हा फक्त प्रशासन आणि महसूलासाठी होता. पण सध्याच्या स्थितीत या गॅझेटियरमधील जुन्या सरकारी नोंदी या आरक्षणासाठी मुख्य पुरावा म्हणून महत्त्वाची ठरतात.

सातारा जिल्ह्याच्या सरकारी संकेतस्थळावर या 'कुणबी- मराठा दस्त नोंदी' तालुकावार उपलब्ध आहेत. कराड, वाई, माण, फलटण, खटाव, पाटण, कोरेगाव यासह अनेक तालुक्यांतील गावांमध्ये अशी नोंद मिळते. थोडक्यात, ▶▶ उर्वरित पान २ वर

# सात लाखाचे केबल चोर पकडला




**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०१/०९/२०२५ रोजी पोलीस स्टेशन दिंद्रुड हद्दीत मौजे चाडगाव शिवारामध्ये असलेल्या तालेतूताई सोलार प्रोजेक्ट क्रमांक ०४ येथून अज्ञात चोरट्यांनी ६००० मीटर DC कॉपर केबल (1.5 kv, 6 sq.mm gm चोरीस नेली होती. सदर केबलची किंमत रुपये ३,४८,०००/- एवढी आहे. या प्रकरणी सुरक्षा अधिकारी श्री. भागवत नामदेव सांगळे यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे गुरनं. २२९/२०२५, कलम ३०३(२), ३२४(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याच्या तपासादरम्यान संशयित आरोपी राजू अर्जुन काळे, वय २५ वर्षे, रा. लक्ष्म ीनगर, भूम, जि. धाराशिव यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने सदर चोरी इतर ६ ते ७ साथीदारांसह केल्याची कबुली दिली. आरोपीसह चोरट्यांनी चोरी केलेला मुद्देमाल पोलिस व स्थानिक नागरिकांची चाहूल लागल्याने ठिकाणीच ठेवून पसार झाल्याचे उघड झाले. आरोपीच्या कबुलीवरून दाखविलेल्या ठिकाणी केलेल्या तपासणीत ▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यातील ७ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस बरसणार

**मुंबई । प्रतिनिधी**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पालघर, ठाणे, रायगड, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील घाटम ाथ्याच्या परिसराला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मराठवाड्यातील बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस आणि वादळे येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भामध्ये अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर,



वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आज पावसाची शक्यता असून उद्यापासून पावसाचा जोर ओसरणार आहे. दरम्यान, गणेश विसर्जनानंतर महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पाऊस कमी होण्याची शक्यता आहे.

# आरोग्य कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## कायम करण्यासाठी कर्मचाऱ्यांचे बेमुदत आंदोलन सुरुच



**बीड । प्रतिनिधी**

आरोग्य विभागामध्ये कंत्राटी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे या मागणीसाठी गेल्या काही दिवसांपासून कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलन करत आहेत. या आंदोलनामुळे आरोग्यविभागाचे कामकाज कोलमडले. आज बीड येथील कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

▶▶ उर्वरित पान २ वर

# 'लवकर लग्न करु अन् घर घेऊ'; महिला शिक्षिकेला फसवलं

## माजी जिल्हा परिषद सदस्यावर अत्याचाराचा गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात एका पाठोपाठ एक हादरवणाऱ्या घटना समोर येत आहेत. एक दिवसही असा जात नाही की, जिल्ह्यात गुन्हेगारीची घटना घडली नसेल. मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर तर जिल्ह्यात गुन्हेगारीचं प्रमाण वाढलं आहे.



काही दिवसांपूर्वी परळी येथील रेल्वे स्टेशन परिसरातील चिम ुरडीवर अत्याचाराचं प्रकरण ताजे असताना आणखी एक धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे.

बीड येथील माजी जिल्हा परिषद सदस्य नारायण शिंदे याच्यावर महिला शिक्षिकेवर बलात्कार केल्याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने बीड येथील शिवाजी नगर पोलिस ठाण्यात नारायण शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, शिंदे याने २००६ पासून ते २०२२ पर्यंत लग्नाचं आमिष दाखवून वारंवार ▶▶ उर्वरित पान २ वर

# एका झाडासाठी शेतकऱ्याला रेल्वेकडून १ कोटीची नुकसानभरपाई

## पण...; मुल्यांकनात निघालं दुसरच झाड, विषय हायकोर्टात

**नागपूर । प्रतिनिधी**

बॉलिवूडमध्ये अन् सिनेसृष्टीत गाजलेल्या पुष्पा चित्रपटात रक्तचंदन म्हणजेच लाल चंदनाम ुळे अनेकांची प्रचंड भरभराट होत असल्याचे आपण सर्वांनी पाहिले आहे. मात्र, त्याच रक्तचंदना पायी विदर्भातील एका शेतकऱ्यावर श्रीमंती गमावण्याची वेळ आली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील खर्ची गावातील पंजाबराव शिंदे या शेतकऱ्यासोबत ही घटना



घडलीय. शिंदे कुटुंबीयांच्या वडिलोपार्जित शेतीमध्ये असलेले हे रक्तचंदनाचे झाड १०० वर्षांपेक्षा जास्त जुने, या डौलदार वृक्षामुळे पंजाबराव शिंदे व त्यांच्या इतर चार भावांना रेल्वे खात्याकडून ५० लाख रुपये मिळाले होते. मात्र, आता ते झाड चंदनाचे नसल्याचे सांगत त्यांच्याकडून ती रक्कम परत घेतली जात आहे.

शिंदे कुटुंबीयांची सात एकर शेती असलेल्या खर्ची गावातून ▶▶ उर्वरित पान २ वर

# सिंदफणा नदीपात्रात वयोवृद्ध शेतकरी गेला वाहून

## गेवराई येथील घटना

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मौजे कानडा पिंपळा येथील एक वयोवृद्ध शेतकी संदीपान रामकिसन ढोरमारे सिंधफणा नदी पात्रात वाहुन गेल्याची माहिती आहे. दरम्यान, गेवराई तहसील प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून, पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर












# शिक्षक दिन : ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचा उत्सव



भारतामध्ये दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो . हा दिवस आपल्या देशाचे दुसरे राष्ट्रपती आणि महान तत्त्वज्ञ डॉ . सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा होतो . त्यांनी आयुष्यभर शिक्षण , अध्यापन आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रसार यासाठी अथक परिश्रम घेतले . त्यांच्या विद्यार्थ्यांनी वाढदिवशी सन्मान करण्याची इच्छा व्यक्त केली असता त्यांनी नम्रपणे सांगितले की , माझा वाढदिवस साजरा करण्यापेक्षा तो दिवस शिक्षक दिन म्हणून पाळावा . त्या उदात्त विचारातून भारतात शिक्षक दिन साजरा करण्याची परंपरा सुरू झाली .

भारतीय संस्कृतीत गुरूला सदैव उच्च स्थान आहे . गुरुकुल परंपरेपासून ते आजच्या आधुनिक शिक्षणपद्धतीपर्यंत शिक्षकच विद्यार्थ्यांच्या घडणीत केंद्रस्थानी आहेत . आचार्य देवो भव ही संकल्पना केवळ वाक्यात नाही , तर भारतीय परंपरेत शिक्षक म्हणजेच आदर्श , प्रेरणास्थान आणि जीवनाचा मार्गदर्शक आहेत . शिक्षकांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अनन्यसाधारण आहे . ते फक्त ज्ञान देत नाहीत , तर चारित्र्य , संस्कार , शिस्त , आत्मविश्वास आणि समाजाप्रती कर्तव्यभावना शिकवतात . डॉक्टर , अभियंता , शास्त्रज्ञ , कलाकार , नेते , लेखक या सर्वांच्या घडणीत शिक्षकांचाच हातभार असतो . ए . पी . जे . अब्दुल कलाम यांनी स्वतःला सर्वप्रथम शिक्षक म्हणून मांडले . त्यांना वाटायचे की शिक्षक हा समाजातील खरी संपत्ती घडवणारा शिल्पकार आहे . आजच्या काळात शिक्षकांच्या जबाबदाऱ्या खूपच वाढल्या आहेत . माहितीचा महासागर विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटरनेटमधून सहज उपलब्ध असला तरी त्या माहितीला योग्य दिशा देणे , विवेक शिकवणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना तयार करणे हे काम फक्त शिक्षकच करू शकतात . स्पर्धात्मक जग , बदलते करिअर पर्याय , सामाजिक आव्हाने , मानसिक आरोग्याचे प्रश्न या सर्वांमध्ये शिक्षक विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक दीपस्तंभ ठरतात. शिक्षक दिन केवळ भारतातच नव्हे तर जगभर विविध दिवशी साजरा केला जातो . युनेस्कोच्या वतीने ५ ऑक्टोबर हा जागतिक शिक्षक दिन ( जागतिक टीचर्स डे ) म्हणून मान्यता प्राप्त आहे . या दिवशी जगभरातील शिक्षकांचे कार्य , त्यांच्या समस्या आणि शिक्षणक्षेत्रातील योगदान यांचा गौरव केला जातो . अमेरिकेत मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात टीचर ॲप्रिसिएशन वीक साजरा केला जातो . चीनमध्ये १० सप्टेंबरला , रशियामध्ये ५ ऑक्टोबरला , तर थायलंडमध्ये १६ जानेवारीला शिक्षक दिन पाळला जातो . प्रत्येक देशात दिनांक वेगळा असला तरी भावना तीच – शिक्षकांचा सन्मान , त्यांचा गौरव आणि त्यांच्या योगदानाची आठवण . भारताचा शिक्षक दिन मात्र विशेष आहे कारण तो एका महान शिक्षकाच्या जन्मदिनाशी जोडलेला आहे. जागतिक पातळीवर आज शिक्षणासमोर अनेक आव्हाने आहेत. शिक्षक दिन आपल्याला आठवण करून देतो की शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता आयुष्यभर आपल्या आचरणातून दिसला पाहिजे . म्हणून शिक्षक दिन हा फक्त औपचारिक उत्सव नाही , तर कृतज्ञतेची अभिव्यक्ती आहे . तो समाजाला आणि विद्यार्थ्यांना सांगतो की शिक्षक हेच भविष्याचे शिल्पकार आहेत . राष्ट्राच्या प्रगतीचा पाया हे शिक्षक आहेत आणि त्यांचा गौरव करणे म्हणजेच उज्ज्वल भविष्याची हमी देणे होय .



**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके, तहसीलदार, बीड**

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकाची भूमिका किती प्रभावी

शिक्षकांना पालकांच्या बरोबरीचे मानले जाते. पालकांनंतर, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक सर्वात जास्त जबाबदार असतात. असे म्हटले जाते की देशाच्या भावी पिढ्या प्रगती करतील की विनाश, या दोन्ही गोष्टी शिक्षकाच्या भूमिकेवर अवलंबून असतात. कारण, ज्ञानाधारित अध्यापनाद्वारे, शिक्षक विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता ओळखून त्यांना सक्षमपणे सुधारतो. दुसरीकडे, जर एखादा शिक्षक त्याच्या भूमिका आणि पदाची प्रतिष्ठा विसरला तर त्याचे परिणाम संपूर्ण समाजाला दीर्घकाळ भोगावे लागतात. शिक्षक हे गुणांची खाण असल्याचे म्हटले जाते, ज्यामध्ये विषय ज्ञान, संवाद कौशल्य, अध्यापनाची आवड, सकारात्मक दृष्टिकोन, सर्जनशील विचारसरणी, संशोधक, संयमी, चारित्र्यवान, सत्य, बुद्धिमान, मेहनती, सहनशील, मृदुभाषी, वेळेचे मूल्य जाणणारा, कोणत्याही भेदभावाशिवाय सर्व विद्यार्थ्यांकडे समानतेने पाहणारा, त्यांची कौशल्ये समजून घेणारा, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नेहमीच संघर्ष करणारा हे असे गुण शिक्षकात असतात. हे गुण खऱ्या शिक्षकाची ओळख आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी आदर्श मार्गदर्शक, प्रेरणेचे स्रोत आणि मित्र असतात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांच्या नैतिक आणि चारित्र्य विकासात शिक्षकांचे मोलाचे योगदान असते. म्हणजेच, शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षित करतातच सोबत त्यांना चांगले जीवन जगण्यास सक्षम आणि त्यांना सुजान नागरिक बनवतात. शिक्षणाचा खरा अर्थ केवळ पुस्तकी ज्ञान किंवा तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे असा नाही, तर ती एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक क्षमतांचा सर्वांगीण विकास होतो. ज्ञान आणि अनुभवाद्वारे एखाद्या व्यक्तीला बुद्धिमान, संवेदनशील आणि समाजासाठी उपयुक्त बनवणे हा त्याचा उद्देश आहे, जेणेकरून तो जीवनातील समस्या सोडवू शकेल आणि एक सुसंस्कृत नागरिक बनू शकेल.

एक काळ असा होता जेव्हा शिक्षण हे समाजसेवेचा एक भाग होते, तेव्हा समाजसुधारक शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी आणि समाजात एक नवीन क्रांती घडवून आणण्यासाठी संघर्ष करत असत, पण आजच्या व्यापारीकरणाच्या युगात शिक्षणाकडे व्यवसाय म्हणून पाहिले जाते.





देशातील उच्च सरकारी अधिकारी, नेते, कर्मचारी आणि स्वतः सरकारी शिक्षकही त्यांच्या मुलांना महागड्या खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण देण्यास प्राधान्य देतात. कारण ते कदाचित सरकारी शिक्षण व्यवस्थेवर समाधानी नसतील आणि श्रीमंत कुटुंबातील मुले थेट परदेशात शिक्षण घेण्यास प्राधान्य देतात. दरमहा एक लाख ते दीड लाख रुपये पगार मिळवणारे सरकारी शिक्षकही त्यांच्या मुलांना खाजगी शाळांमध्ये शिकवतात, असे का घडते? सरकारी शिक्षकांना त्यांच्या स्वतःच्या शिक्षण व्यवस्थेवर विश्वास नाही का? सर्वात पवित्र मानल्याजाणाऱ्या शिक्षक वर्गातही अनेक घृणास्पद घटना शिक्षण जगताला कलंकित करत आहेत, आजही देशातील ही परिस्थिती फारशी बदललेली नाही. सध्या महाराष्ट्र राज्यातही सरकारी शालार्थ आयडी घोटाळा चर्चेत आहे. शेकडो सरकारी अनुदानित शाळांमधील शिक्षकांचे खोटे आकडे दाखवून वर्षानुवर्षे पगाराच्या नावाखाली सरकारचे कोट्यवधी रुपये लुटले जाण्याच्ये धंधे सर्रास सुरु होते.

शिक्षणातही भ्रष्टाचार शिगेला पोहोचला आहे, त्याबद्दल सर्वांना माहिती आहे, पण त्याविरुद्ध कोणीही बोलू इच्छित नाही. महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षक भरतीच्या नावाखाली भ्रष्टाचाराच्या बातम्या आपण अनेकदा पाहतो, ऐकतो आणि वाचतो. ही भरती एका गठित समितीद्वारे केली जाते, विद्यापीठाच्या कुलगुरू आणि राज्य सरकारच्या मंत्र्यांकडे तक्रार करूनही, सुधारणेच्या नावाखाली फक्त आश्वासने ऐकू येतात. आतापर्यंत सरकारने या भरतींची पूर्ण जबाबदारी स्वतः कडे घेतलेली नाही. अशा व्यवस्थेत, पात्रता असूनही प्राध्यापक होण्याचे गरीब आणि प्रामाणिक लोकांचे स्वप्न संघर्ष आणि भ्रष्टाचारात दबले जाते.

देशातील काही आर्थिकदृष्ट्या सक्षम खाजगी शैक्षणिक संस्थांची स्थिती समाधानकारक आहे, परंतु बहुतेक खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये, कदाचित सर्वात शिक्षित शिक्षक सर्वात कमी पगारावर काम करतात. अनेक खाजगी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षकांना रोजंदारी कामगारापेक्षा कमी वेतन मिळते. यासोबतच, एका पदावर काम करताना, त्यांना संस्थेची इतर कामे देखील करावी लागतात. या क्षेत्रातील बेरोजगारीचा दरही सर्वाधिक आहे. आजच्या महागाईच्या काळात, २५००-३००० रुपये दरम हा पगार काहीच महत्त्वाचा नाही. तरीही मोठ्या संख्येने शिक्षक या पगारावरही काम करत आहेत, ही आपल्यासाठी खूप लाजिरवाणी आणि दुःखाची बाब आहे. अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये, संस्थांचे मालक शिक्षकांशी वाईट वागतात आणि त्यांना त्यांच्या वैयक्तिक कामात व्यस्त ठेवतात. अनेक संस्थांमध्ये शिक्षकांचे पगार महिने आणि वर्षे प्रलंबित ठेवले जातात, काही ठिकाणी पदोन्नती थांबवल्या जातात आणि मानसिक छळही केला जातो, म्हणूनच शिक्षकांमध्ये आत्महत्यांच्या घटनाही वाढत आहेत.

शिक्षणाच्या जगात आता विद्यार्थ्यांचे एक नवीन रूप दिसून येत आहे; लहान मुले देखील त्यांच्या शाळेच्या बॅगमध्ये नको असलेल्या वस्तू घेऊन फिरताना आढळतात, ज्यामध्ये अंमली पदार्थ, घातक शस्त्रे देखील असतात. पूर्वी, शिक्षक चुकांसाठी विद्यार्थ्यांना मारहाण करत असले तरी पालक त्याला काही विशेष आक्षेप घेत नव्हते. आता, चुकांसाठी विद्यार्थ्यांना मारहाण करणे तर दूरच, त्यांना फटकारणे देखील शिक्षकांना गुन्हा वाटू लागते. काही महिन्यांपूर्वी, पंजाब आणि हरियाणामध्ये, शालेय विद्यार्थ्यांनी त्यांच्या मुख्याध्यापकांची चाकूने वार करून हत्या केली. आता शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांना धमकावल्याच्या घटनाही सातत्याने समोर येत आहेत. आपल्या देशात बालगुन्हेगारांचा ग्राफ झपाट्याने वाढत आहे. पालक व्यस्तता दाखवत आहेत, शिक्षक व्यावसायिक होत आहेत, मग देशातील पिढी गुन्हेगारीच्या दलदलीत अडकणे अपरिहार्य आहे. महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार, २०२२ सालच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, अल्पवयीन गुन्हेगारांच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे, त्यानंतर मध्य प्रदेश, राजस्थान, तामिळनाडूचा क्रमांक लागतो.

लोक म्हणतात की सरकारी शाळांची अवस्था वाईट आहे, मग तिथल्या शिक्षकांना पगार तर भरपूर मिळतो, तर शैक्षणिक गुणवत्ता का सुधारत नाही. दुसरीकडे, देशातील बहुतेक खाजगी संस्थांमध्ये शिक्षकांचे पगार खूपच कमी आहेत, मग अशा परिस्थितीत देशाची शिक्षण व्यवस्था कशी मजबूत होईल? शैक्षणिक गुणवत्तेचा स्तर कसा वाढेल? खाजगी संस्थांमध्ये, कमी पगाराचा शिक्षक देशाचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी मनापासून चिकाटीने आणि मेहनतीने कसा काम करू शकतो? जेव्हाकी त्या शिक्षकाचा वर्तमान स्वतः अंधारात आहे. देशातील बहुतेक ठिकाणी ही परिस्थिती आहे, हे सर्व पाहता, आजचा शिक्षक खरोखरच देशाच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार म्हणण्यास पात्र आणि सक्षम आहे का? केंद्रीय विद्यालय, आयआयटी, आयआयएम, एम्स सारख्या शैक्षणिक संस्था प्रत्येक गावाची, प्रत्येक शहराची गरज आहेत, प्रत्येक विद्यार्थ्याला कोणताही आर्थिक भेदभाव न करता समान दर्जाचे शिक्षण मिळालेच पाहिजे.

बिहारमधील खाजगी कोचिंग सेंटरचे प्रसिद्ध शिक्षक खान सर यांनी अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, देशातील सरकारी शिक्षण व्यवस्था अतिशय वाईट परिस्थितीतून जात आहे, ज्याचा पुरावा म्हणजे खाजगी कोचिंग सेंटर विद्यार्थ्यांनी खचाखच भरलेले आहेत. शिक्षणासाठी खाजगी कोचिंग सेंटर्सवरील विद्यार्थ्यांचे अवलंबित्व प्रचंड वाढत आहे. सर्व विद्यार्थ्यांना नाममात्र पदवी मिळाली तरी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास त्याच्या उद्दिष्टापासून खूप दूर राहील. आपण आपल्या आयुष्याचा सर्वात मोठा भाग शिक्षणात म्हणजे आपले शरीर, मन आणि पैसा खर्च करतो. जर ते शिक्षण आपल्याला चांगले राहणीमान प्रदान करण्यास सक्षम असल्याचे सिद्ध झाले तर ते चांगले आहे, अन्यथा जीवन एक संघर्षच बनून राहते, जे आपण बघतच आहोत. जोपर्यंत शिक्षकांना समाजसुधारक म्हणून त्यांची भूमिका समजत नाही, तोपर्यंत देशाच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्याबद्दल प्रश्न उपस्थित होत राहतील.

**– डॉ. प्रीतम भी. गेडाम**

◆ पान ४ वरून पुढे...

## उपोषणानंतर जरांगेंची...

बोलायची गरज नाही त्यांनी मला येऊन सांगायला पाहिजे. कुठलीही त्रुटी नाही. मात्र, काही बदल करायची असेल तर ते होईल असेही विखे पाटील म्हणाले. काही लोक नाराज, पण त्यांनी कधी आंदोलनात सहभाग घेतला नाही– लोकांना आधी समजू द्या नेमके काय काम चालू आहे. त्यावरुन लोकांना पण नंतर कळेल कसे काम सुरु आहे, त्यावेळी संभ्रम दूर होईल असे विखे पाटील म्हणाले. काही लोक नाराज आहेत त्यांनी कधी आंदोलनात सहभाग घेतला नाही कधी येऊन भेटले नाही आणि आता संभ्रम निर्माण करत असल्याचे विखे पाटील म्हणाले. जशा अडचणी येतील तशा दुरुस्ती करु असेही विखे पाटील म्हणाले. मंत्री छगन भुजबळ यांच्यासोबत चर्चा झाली आहे. त्यांना मी सकाळी बोललो आहे असे विखे पाटील म्हणाले. ज्यांना वाटतं आम्ही फसवणूक केली त्यांना मी काही करु शकत नाही. मला त्यांना प्रश्न विचारायचा आहे की सरकारी चर्चेत तुम्हाला यायला काय अडचण होती. तुम्ही तुमची मतं मांडली असती तर ऐकले असते असेही विखे पाटील म्हणाले. चर्चेसाठी या, संभ्रम निर्माण करणाऱ्यांना माझी विनंती– संभ्रम निर्माण करणाऱ्यांना माझी विनंती आहे माझ्याकडे या आपण चर्चा करु मी माझे दरवाजे बंद केले नाहीत असे विखे पाटील म्हणाले. यावेळी विखे पाटील यांनी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर देखील टीका केली. त्यांना काही काम देण्याची गरज आहे. पक्ष सत्तेत नसल्यामुळे त्यांच्याकडे काही काम नाही. मला वाटते संजय राऊत यांनी कोचिंग क्लास घेतले पाहिजे असी टीका विखे पाटील यांनी केली. विखे पाटलांनी घेतलेल्या भेटीबाबत मनोज जरांगे काय म्हणाले?– हैदराबाद गॅझेट सातारा गॅजेटमध्ये कशी प्रक्रिया राबवायची याबद्दल चर्चा करायची आहे. प्रक्रियेमध्ये जास्त वेळ जाऊ नये म्हणून काही बदल करायचे आहेत असे विखे पाटील म्हणाले. दोन दिवसाच्या आत विषय संपला पाहिजे. दोन दिवसात प्रमाणपत्र मिळाले पाहिजे यासाठी दुरुस्ती असेल तर काही मुद्दे असेल त्यासाठी त्यांनी अभ्यासकांना बोलावले आहे असे विखे पाटील म्हणाले. एकदा जीआर वर काम चालू झाले की प्रमाणपत्र वाट पाहायला वेळ लागला नाही पाहिजे त्यासाठी चर्चा होणार आहे असे विखे पाटील म्हणाले. हैदराबाद गॅझेटमध्ये लिहिले आहे की मराठवाड्यात मराठा नव्हताच; त्यानुसार मराठवाड्यातील सर्व मराठी आरक्षणात जाईल असे विखे पाटील म्हणाले.

◆ पान ४ वरून पुढे...

होईल सगळं होईल तुम्ही थांबा, मराठवाडा सगळा आरक्षणात जाणार असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. माझ्यावर विश्वास ठेवा गैरसमज करणाऱ्यांवर विश्वास ठेवू नका. राजकारण हाकणाऱ्या लोकांवर विश्वास ठेवून पायावर दगड पाडून घेऊ नका असेही विखे पाटील म्हणाले.

## मराठा आणि....

सातारा गॅझेटियर हा केवळ महसूल नोंदीसाठी तयार केलेला जुना दस्तऐवज असला तरी, त्यातल्या 'मराठा–कुणबी' नोंदींमुळे आज तो मराठा आरक्षण लढाईतील एक महत्त्वाचा पुरावा ठरला आहे.

## सात लाखाचे...

सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल, ६००० मीटर DC कॉपर केबल किंमत ₹३,४८,०००/–, बोलेरो जीप क्र. MH 22 U ५७५७ किंमत अंदाजे ₹३,४०,०००/–, असा एकूण किंमत ₹६,८८,०००/– चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणातील इतर आरोपींची नावे निष्पन्न करून त्यांना अटक करण्यासाठी पुढील तपास पोऊपनि. संजयकुमार राठोड हे करीत आहेत. सदरची कारवाई नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, मा. श्रीमती चेतना तिडके मॅडम अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शैलेश गायकवाड साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स्टे. दिंद्रुड प्रभारी अधिकारी महादेव ढाकणे सहाय्यक पोलीस निरीक्षक, सलमान शेख पोलीस उपनिरीक्षक, संजयकुमार राठोड, पोना/राम ढवळे, पोशि/सचिन गायकवाड, चालक पोशि/ ज्ञानेश्वर मेहत्रे यांनी केली.

## आरोग्य कर्मचाऱ्यांचा...

काढला होता. गेल्या अनेक वषारपासून आरोग्य विभागातील कर्मचारी कंत्राटी बेसवर काम करत आहेत. या कर्मचाऱ्यांना नियमित शासन सेवेत सामावून घेण्यात यावे, बदली धोरण राबवण्यात यावे, वेतनवाढ करण्यात यावी यासह इतर मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या या आंदोलनामुळे आरोग्यविभागाचे कामकाज कोलमडून पडले. आज कर्मचाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून मोर्चा काढला होता. हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या वेळी कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांचे

◆ पान ४ वरून पुढे...

निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले.

## 'लवकर लग्न....

बलात्कार केला. याचबरोबर 'घर घेऊन देतो', म्हणत तब्बल १ कोटी १० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचाही आरोप या फिर्यादीत करण्यात आला आहे. महिला शिक्षिकेनं या त्रासाला कंटाळून बीड येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याच तक्रारीवरुन नारायण शिंदे याच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कलम ३७६, ३७६ (२) (एन), ४०६, ५०६ कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला असल्याचं सांगण्यात येत आहे. आरोपी नारायण शिंदे हा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून त्याची ओळख आहे. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, घटनेचा तपास बीड येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे संबंधित अधिकारी करत असल्याचं सांगण्यात येत आहे.

## एका झाडासाठी...

वर्धा–यवतमाळ–पुसद–नांदेड ही नवी रेल्वे लाईन टाकली जाणार आहे. त्यासाठी अनेक वर्षांपूर्वी सर्वेक्षण होऊन २०१३ मध्ये शिंदे कुटुंबीयांची बागायात असलेली सात एकर शेती रेल्वेने अधिग्रहित केली. २०१८ मध्ये जमिनीसाठी १ कोटी ३३ लाख रुपयांचा मोबदला ही देण्यात आला. मात्र जमिनीवरील झाडांसाठीचा मोबदला निश्चित करण्यात आला नव्हता. शिंदेंच्या शेतावरील अनेक जुन्या झाडांपैकी शंभर वर्ष जुना रक्तचंदनाचेही एक झाड होते. अनेकवेळेला प्रयत्न करूनही रेल्वेकडून झाडांबद्दलची नुकसान भरपाई मिळत नसल्यामुळे पंजाबराव शिंदे यांनी गेल्या वर्षी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाच्या निर्देशानंतर ही रेल्वेने रक्त चंदनाच्या झाडाचे वन विभागाकडून योग्य मूल्यांकन करून घेतले नाही. दुसऱ्या बाजूला शिंदे कुटुंबीयांनी खासगी तज्ञांकडून मूल्यांकन करवून घेत १०० वर्षांपेक्षा जास्त जुन्या रक्तचंदनाच्या झाडासाठी ४ कोटी ९७ लाख रुपयांचे मूल्यांकन काढले होते. रेल्वेकडून झाडांच्या मूल्यांकनासंदर्भातल्या प्रक्रियेमध्ये टाळाटाळ करून दिरंगाई केली जात असल्याचे लक्षात येताच न्यायालयाने रक्तचंदनाच्या त्या झाडासाठी १ कोटी रुपयांची नुकसान भरपाई निश्चित केली होती. त्यापैकी ५०

◆ पान ४ वरून पुढे...

लाख रुपये शिंदे कुटुंबीयांना देण्याचे आणि उरलेले ५० लाख रुपये रेल्वेकडून योग्य मूल्यांकन होईपर्यंत न्यायालयात जमा ठेवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते. त्याच अनुषंगाने यावर्षी मे महिन्यात शिंदे कुटुंबीयांना ५० लाख रुपये रक्तचंदनाच्या झाडापायी मिळाले. मात्र, केवळ एका झाडासाठी १ कोटी रुपये द्यावे लागत आहेत, हे लक्षात आल्यानंतर रेल्वे अधिकाऱ्यांना जाग आली आणि मूल्यांकनाच्या प्रक्रियेची आठवण झाली. त्यानंतर रेल्वे अधिकाऱ्यांनी नुकतेच वन विभागाकडून रक्तचंदनाच्या झाडा संदर्भात मूल्यांकनाची प्रक्रिया पार पाडली. ज्या झाडाला काही वर्षांपूर्वी रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी १०० वर्षे जुने असल्याचे सांगत ते रक्तचंदनाचे झाड असल्याचे मान्य केले होते. त्याच झाडाला नुकतच वन विभागासोबत केलेल्या मूल्यांकनाच्या वेळेला रेल्वेने रक्तचंदन मान्य करण्यास नकार दिला आणि तो बिजासालचे झाड असल्याचे सांगत त्यासाठी अवघ्या १० हजार ९८१ रुपयांची नुकसान भरपाई निश्चित केली आहे. रेल्वेच्या या घूमजावामुळे शिंदे कुटुंबीयांची केवळ अडचणच झालेली नाही, तर ते वनविभाग आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांवर प्रचंड नाराज आहे.

## सिंदफणा नदीपात्रात...

व महसुल विभागाचे अधिकारी व कर्मचारी नदी पात्रात वाहून गेलेल्या शेतकर्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, गेवराई तालुक्यातील हिरापूर जवळून वाहणारी सिंदफणा नदी दुथडी भरून वाहत आहे. गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे यांनी घटनास्थळी भेट दिली असून, महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांना संबंधित शेतकयारचा शोध घेण्या संदर्भात सूचना दिल्या आहेत.दरम्यान, या घटनेची माहिती उपसरपंच इलियास पटेल यांनी दिली असून, ते म्हणाले की ; संदीपान ढोरमारे हे आपल्या शेतात जाण्याठी सकाळी साडे अकरा वाजता निघाले होते. नदीपात्रातून जात असताना त्यांना पाण्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे, दुथडी भरून वाहणार्या सिंदफणा नदीपात्रातील धारेत ते वाहून गेल्याची भिती व्ये करण्यात आली. प्रशासनाच्या वतीने त्यांचा शोध घेण्यात आला आहे. परंतु, त्यांचा शोध लागला नाही. अंधार पडल्यावर शोधकार्य थांबवण्यात आले असून, एनडीआरएफ चे आणखी एक पथक गुरूवार दि. ४ रोजी येणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. दरम्यान, गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे उशिरापयरत घटनास्थळी ठाण मांडून होते.

◆ पान ९ वरून पुढे...

## शेतकऱ्यांनो, 14...

तालुकानिहाय स्थिती (दि. २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत ) : केज तालुका आघाडीवर असून येथे ३३.५८% नोंदणी (९३,४१४ प्लॉट्स / ४६,६७० हेक्टर) झाली आहे . माजलगाव – ३०.३५% , अंबाजोगाई – ३१.५६% , परळी – २९.०३% , वडवणी – २०.३% इतकी नोंदणी झाली आहे . बीड तालुक्यात सर्वाधिक पात्र प्लॉट्स (३.८७ लाख) असून त्यापैकी फक्त १४.८५% (५७,८५० प्लॉट्स) ची नोंद झाली आहे . आष्टी (४.३८%) , पाटोदा (६.५२%) , शिरूर (११.७७%) या तालुक्यांमध्ये नोंदणी अत्यल्प आहे . एकूण जिल्ह्यात २,५३,८६८ हेक्टर क्षेत्र नोंदवले गेले असून हे एकूण क्षेत्रफळाच्या केवळ १८.३५% इतके आहे. ई पीक पाहणीचे फायदे व प्रशासनाचे आवाहन : निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्पष्ट केले की , ई–पीक पाहणी नोंदणी म्हणजे फक्त औपचारिकता नाही . भरपाई ,

◆ पान ९ वरून पुढे...

पीक कर्ज, अनुदान, शासकीय खरेदी यासाठी ही नोंदणी अत्यावश्यक आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले, शेतकरी बांधवांनी अंतिम तारखेपूर्वी नोंदणी पूर्ण करावी. अडचण आल्यास ग्रामपंचायत , कृषी सहाय्यक किंवा महसूल अधिकारी यांच्याकडे त्वरित संपर्क साधावा. ई–पीक पाहणी म्हणजे शेतकऱ्यांच्या हक्काची नोंद आहे . ही नोंदणी शेतकऱ्यांचे पीक सुरक्षित ठेवते, योग्य दर मिळवून देते आणि भविष्यासाठी संरक्षणाची हमी देते .

## टेंबे चरणी...

गिरीष बजाज यांचे वतीने कान तर हातातील कंगन सचिन श्रीकांत रूद्रवार यांचे वतीने देण्यात आले तर चांदीचे मोदक, दुर्वा देखिल श्रीचरणी अर्पण केल्या आहेत. भाविकांनी हार, तुरे न आणता श्रीचरणी वही, पेन अर्पण करावेत असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष अनंतशास्त्री जोशी यांनी केले आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## रानडुकरांनी लिंबागणेश...

जंगलालगतच्या गावांना सौरकुंपणाचा लाभ दिला जातो. मात्र रानडुकरं, मोर, हरणे यांचा त्रास जंगलालगतच्या गावापुरता मर्यादित नसून अनेक शेतकरी गावांमध्ये होत आहे. त्यामुळे ही योजना सर्व गावांसाठी लागू करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## जनावरं चोरांची...

सोमनाथ गायकवाड, आशपाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे, महिला हवालदार स्वाती मुंडे व चालक सिद्धेश्वर मांजरे यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.या कारवाईमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून जनावरे चोरीच्या घटनांना आळा बसण्याची शक्यता आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## अथर्वशीर्ष पठणातून...

आला. हा उपक्रम बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा ॲड. निलमताई शिर्के–सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर होत आहे. कार्यक्रमाची सुरुवात देवकी नामदेव साळुंके व स्वराली नामदेव साळुंके यांच्या पंचरत्न स्तोत्र गायनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केले. पठणानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. अथर्वशीर्ष पठणासाठी मार्गदर्शक म्हणून गौरी गणेश कुलकर्णी, जान्हवी गिरीश देशपांडे, प्रा.अनिता वैद्य व संस्कृत अध्यापिका खके यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव साळुंके यांनी केले, तर आभार डॉ.अनिता शिंदे यांनी मानले. यावेळी दुष्यंता रामटेके, अनुराधा चिंचोलकर, अमित गाडे, दीपक जमधाडे, विजय राख, राहुल सोनवणे, सुरेश थोरात, इंद्रजीत भांगे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# उतारवयात द्यावी लागणार 'या' शिक्षकांना 'टीईटी'

## परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास घ्यावी लागणार सक्तीची सेवानिवृत्ती

**सोलापूर । प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभागाने १३ फेब्रुवारी २०१३ रोजी आदेश काढून प्राथमिक शिक्षकांसाठी 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) बंधनकारक केली. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने त्यापूर्वी नोकरीला लागलेल्या शिक्षकांसाठी देखील 'टीईटी'चे बंधन घातले आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार प्राथमिक शाळांवरील ज्या शिक्षकांचे वय ५३ वर्षे आहे, त्यांना दोन वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे. प्राथमिक शाळांवरील ५३ वर्षांपर्यंतच्या सर्वच शिक्षकांना दोन वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण करावी, अन्यथा त्यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई करावी, असेही आदेश आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे महराष्ट्र, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगालसह बहुतेक राज्य सरकार पुढे पेच निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाने शासनाला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे.दुसरीकडे शिक्षकांमध्ये संभ्रम असून वयाची पन्नाशी पार केलेल्या शिक्षकांना आता त्यांच्या नातवंडासोबत 'टीईटी'ची परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यासाठी अवघ्या दोन संधी देण्यात आल्या आहेत. राज्यात प्राथमिक शाळांची संख्या ६५ हजार ८० तर उच्च प्राथमिक शाळांची संख्या २२ हजार ३६० इतकी आहे. या शाळांवर सुमारे पावणेपाच लाख शिक्षक असून त्यातील २०१३ पूर्वीच्या सर्व शिक्षकांना (ज्यांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे असे) देखील 'टीईटी उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. परंतु, फेब्रुवारी २०१३ पूर्वीच्या शिक्षक सेवेत येताना त्यांना ही अट व शर्त लागू नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर महाराष्ट्र शासन आपले म्हणणे सादर करेल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.



**शासनाच्या आदेशानुसार कार्यवाही–**

**सर्वोच्च न्यायालयाने प्राथमिक शिक्षकांसाठी टीईटी बंधनकारक असल्याचा निकाल दिला आहे. ११० पानांचा तो आदेश असून त्यावर अभ्यास करून शासनाकडून आदेश प्राप्त होतील. त्यानुसार आम्ही कार्यवाही करणार आहोत.**

## थोडक्यात...

### जी. एस. टी. कर कपातीमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळणार –कृषी मंत्री दत्तात्रय भरणे



**मुंबई । प्रतिनिधी**

शेती क्षेत्राला चालना देण्यासाठी जीएसटी परिषदेने कृषी यंत्रसामुग्री, साधने, खते व बियाणे अशा विविध गोष्टींवरील कर कपात करत शेतकऱ्यांना नवसंजीवनी दिली आहे. कररचनेतील कपात, म ध्यस्थांवरील नियंत्रण आणि बाजारपेठेतील स्पर्धात्मक वातावरणामुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळणार असून शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीला या निर्णयामुळे चालना मिळणार असल्याची प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. नवी दिल्ली येथे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली 'जीएसटी' परिषदेच्या ५६ व्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. २२ सप्टेंबरपासून लागू होत असलेल्या नव्या जीएसटी (वस्तू व सेवा कर) मुळे व्यापार व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात पारदर्शकता येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शेतकरी व शेती व्यवसायालाही काही थेट व अप्रत्यक्ष फायदे या नव्या कर प्रणालीमुळे मिळणार आहेत. जीएसटी परिषदेने जीएसटी स्लॅबमध्ये बदल करण्यास मान्यता दिल्यानंतर आता अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत. यात शेतकऱ्यांसाठी ट्रॅक्टर, जमिनीची तयारी/शेती यंत्रे, कापणी यंत्रे, कंबाइन हार्वेस्टर, पिक कापणी मशीन, गवत कापणी यंत्र, कंपोस्टिंग मशीन इत्यादींवर जीएसटी दर १२ टक्के वरून ५ टक्के करण्यात आला आहे.

### लाडकी बहीण योजनेतील ऑगस्टचे पैसे कधी ? बाप्पाच्या विसर्जनाआधी मिळणार खुशखबर ?



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महिलांना आर्थिक पाठबळ देणारी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जनमानसात लोकप्रिय झाली. मात्र योजनेतील पडताळणीमुळे महिलांमध्ये नाराजी आहे. यातच आता ऑगस्टचा हप्ता त्यात जमा न झालेला नाही. सणासुदीच्या काळात महिलांना लाभ मि ळालेला नाही. ऑगस्ट महिना सरला गणपती बाप्पा विराजमान होऊन विसर्जनाची वेळ आली तरी महिलांना ऑगस्टचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. महिला पैसे मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत. यातच आता नवी अपडेट समोर येत आहे. पैशांच्या प्रतिक्षेत असणाऱ्या महिलांसाठी खुशखबर म्हणजे ऑगस्ट आणि सप्टेंबर अशा दोन महिन्यांचे ३ हजार रुपये याच महिन्यात मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दोन्ही महिन्यांचे पैसे याच महिन्यात जमा होणार असल्याचे वृत्त आहे. मात्र दोन्ही हप्ते एकत्र येणार की दोन वेगवेगळ्या तारखांना हे मात्र अद्याप स्पष्ट नाही. याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

# सामाजिक क्रांती करणारा गणेशोत्सव : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

कोरडे गणपती हा नवसाला पावणारा असून नवगण राजुरी, नामलगाव आणि कोरडे गणपती हे भाविकांचे श्रद्धास्थान आहेत. सामाजिक क्रांती करणारा गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी सुरू केला असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



गणेशोत्सवानिमित्त गुरूवार दि. ३ रोजी शहरातील वीरशैव गणेश मंडळ, श्री संस्थान कोरडे गणपती, नवरंग गणेश मंडळ, राष्ट्रीय गणेश मंडळ, शिवनेरी गणेश मंडळ, रूद्रा गणेश मंडळ, सिद्धीविनायक गणेश मंडळाची आरती माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आली तसेच विविध गणेश मंडळाच्या देखाव्याचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अरूण डाके, गणपत डोईफोडे, अशोक लोढा, सुभाष क्षीरसागर आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, कोरडे गणपती येथे आगळावेगळा उपक्रम राबवून गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. गणेशाच्या मंदिरात केलेली प्रार्थना वाया जात नाही. श्रीगणेशाला छप्पन भोग दाखवण्यात आला.

## रोजगार हमी योजनेची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा : पालकमंत्री संजय राठोड

**यवतमाळ । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शासनस्तरावरून मंजूर दारव्हा, दिग्रस, नेर तालुक्यातील कामांच्या प्रगतीचा मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी आढावा घेतला. रोजगार हमी योजनेची मंजूर कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की,उपवनसंरक्षण धनंजय वायभासे, अपरजिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडाचे प्रकल्प अधिकारी अमित रंजन पुसद प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर, दारव्हा, नेर, दिग्रस तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. दारव्हा, दिग्रस, नेर तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत एकूण ५८८ कामे मंजूर आहेत. त्यात दारव्हा २५८, दिग्रस १४१ व नेर तालुक्यातील १८९ कामांचा सम ावेश आहे. यापैकी ३८४ कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

# उदयपूर राष्ट्रीय प्रशिक्षणात महाराष्ट्राचा सांस्कृतिक जलवा

**उदयपूर /बीड । प्रतिनिधी**

सी. सी. आर. टी. आयोजित उदयपूर येथील राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरामध्ये महाराष्ट्राच्या शिक्षकांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांचे मन जिंकले. कार्यक्रम ाचे संचालन दीपक पांडुरंग सरवदे व मनीषा गिरी यांनी उत्साहपूर्ण शब्दांत केले. महाराष्ट्राची ओळख व माहिती शुभांगी पवार आणि शिल्पा श्रृंगारपुरे मॅडम यांनी प्रभावीपणे सादर केली. मधुमती दूगम यांनी गायलेल्या पसायदानाने वातावरण भक्तिमय केले.



विशेष आकर्षण ठरले ते संभाजीनगर जिल्ह्यातील सुनील वनारे यांचे. त्यांनी लावणीचे सुंदर सादरीकरण खास हावभावांनी केला, त्याचबरोबर वासुदेव हा लोककलाप्रकारही सादर केला. महाराष्ट्र येथून गेलेल्या सर्व शिक्षकांनी आपल्या कलेद्वारे विविध राज्यांतील शिक्षकांचे लक्ष वेधून घेतले. सुरेश मालकर यांनी जोशपूर्ण लेझीम नृत्य सादर करून टाळ्यांचा गजर मिळवला.

कार्यक्रमात महिला शिक्षकांनी विविध पारंपरिक नृत्यरचना सादर करून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची झलक दाखवली. दीपक पांडुरंग सरवदे यांनीही ऐतिहासिक दृश्ये अभिनयातून उभी करत रसिकांचे कौतुक मिळवले. संपूर्ण भारत भरातील एकूण ९५ शिक्षक ' बाहुलीनाट्य ' या राष्ट्रीय प्रशिक्षण साठी १३ विविध राज्यातून आलेले आहेत. त्यांना नवीन भारत सरकारच्या शैक्षणिक धोरणानुसार शालेय स्तरावर शिक्षणात बाहुलीनाट्य चा अंतर्भाव करून शिक्षण अधिक आनंददायी कसे करता येईल यासाठी देशपातळीवर विविध मार्गदर्शक मार्गदर्शन करतात. या प्रशिक्षणात देशातून केरळ, पांडेचेरी, छत्तीसगढ, हरियाणा, आंध्र प्रदेश, तेलंगणा,अरुणाचल वेस्ट बंगाल, झारखंड, मणिपूर, राजस्थान या राज्यातील शिक्षक सहभागी झालेले आहेत. प्रशिक्षण दरम्यान शिक्षकांना उदयपूर शहरातील विविध ऐतिहासिक वास्तू दाखविण्यात येणार आहेत. सदरील प्रशिक्षण हे भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालय मार्फत दररोज सकाळी नऊ ते पांच पर्यन्त संपूर्ण वेळ निवासी प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्र राज्यातून विविध जिल्ह्यातील ७ शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी होऊन आपल्या राज्याचे नेतृत्व देशपातळीवर करत आहेत. प्रत्येक दिवशी एक राज्य एक प्रदर्शन असे सकाळी करावे लागते त्यात आज महाराष्ट्र राज्यातील शिक्षकांनी मि ळून महाराष्ट्र राज्याचा सांस्कृतिक जलवा निर्माण केला.




*डि.के नागवे मॅथ्स ण्ड सायन्स अक्ॅडमी येथे गणपती बाप्पाची सायंकाळची आरती करताना वडवणी पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे यांच्या हस्ते आरती करण्यात आली आरती झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संचालक डि.के नागवे सर, पोलीस अंमलदार भुजबळ साहेब, पत्रकार संभाजी लांडे, पै. कृष्णा नागवे व पोलीस कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

## शैक्षणिक कार्य करणाऱ्या मान्यवरांचा जिल्हा पत्रकार संघाकडून होणार सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या स्वरुपाचे उत्कृष्ट कार्य करणार्या काही मान्यवरांचा बीड जिल्हा पत्रकार संघाकडून सन्मान केला जाणार आहे. यामधील सत्कारमुर्तींच्या नावाची घोषणा शिक्षक दिना निमि त्त करण्यात आली आहे. या सर्व पुरस्कारांचे वितरण पुढील आठ दिवसात मान्यवरांच्या हस्ते केले जाईल.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे आणि बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांच्या मान्यतेने सत्कारमुर्तींची निवड आली असल्याचे संयोजन समितीचे अध्यक्ष नितीन क्षीरसागर यांनी सांगितले आहे. उत्कृष्ट शिक्षण संस्था म्हणून ट्विंकलिंक स्टार स्कुल बीड यांची निवड करण्यात आली आहे. शिक्षक पतसंस्थेचा पुरस्कार विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था आष्टी यांना देण्यात आला आहे. लोकसहभागातून शाळेचा सर्वांगिण विकास केल्याबद्दल जि.प.कें.प्रा.शा. शिराळा ता.आष्टी यांचा सन्मान होणार आहे. तसेच शैक्षणिक क्षेत्रात ६५ दिवसात २२१ शाळेम ध्ये १ लाख ६० हजार वह्यांचे वाटप केल्याबद्दल सौ.सिमा ओस्तवाल यांचाही सन्मान होणार आहे.

### जाहिर प्रगटन

**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**
**घर नंबर १–४–१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला,**
**अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**
**तक्रार क्रमांक :– २३३/२०२४**

अर्जदार :– सौ. पुष्पा विक्रम नाईकवाडे,
विरुध्द

गैरअर्जदार:– १. जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को–ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय, जिजाउ पुतळयासमोर,राजीव गांधी चौक, कॅनल रोड बीड, ता.जि. बीड. मार्फत अनिता बबन शिंदे अध्यक्ष, चेअरमन, ४.योगेश नवनाथराव करांडे, संचालक राजीव गांधी चौक, कॅनल रोड बीड, ता. जि. बीड. ५.बबन विश्वनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को–ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, राजीव गांधी चौक, ता.बीड, जि. बीड.

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २४/१०/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक – ०६/११/२०२४
ठिकाण – बीड

(स्वाक्षरीत)
प्रबंधक
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड

शिक्का

ADITYA EDUCATION TRUST's
**Mitthulalji Sarda Institute of Technology**
Nalwandi Road, Suy No. 123, Bahirwadi, Beed - 431 122.

Approved by AICTE New Delhi, DTE Mumbai, Govt. of Maharashtra & Affiliated to Dr.BATU, Lonere & MSBTE Mumbai.
Contact : 9028030583 Email ID : 1492principal@msbte.ac.in
DTE Code 2282

Applications are invited from eligible & interested candidates for admission to First Year & Direct Second Year Engineering for Vacant Seats after CAP Round & Institute Level Seats.

**Schedule of Activities**

| Sr.No. | Activities | Schedule |
|---|---|---|
| **First Year Engineering** | | |
| 1 | Registration | 09/09/2025 up to 01:00 pm |
| 2 | Display of Merit List | 09/09/2025 Till 3:00 pm |
| 3 | Commencement of Admission | 09/09/2025 04:00 pm Onwards |
| **Direct Second Year Engineering** | | |
| 1 | Registration | 12/09/2025 up to 01:00 pm |
| 2 | Display of Merit List | 12/09/2025 Till 3:00 pm |
| 3 | Commencement of Admission | 12/09/2025 04:00 pm Onwards |

If any seat is vacant after that an additional round will be conducted separately and the schedule will be displayed on the college Notice Board. Eligibility as per rules & regulations prescribed by State Common Entrance Test Cell, Mumbai Govt. of Maharashtra Directorate of Technical Education, Mumbai.

Principal

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. ०५ सप्टेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### पाच इसमास बीड तालुक्यात प्रवेश बंदीचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

दि. ०३ सप्टेंबर रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांच्या आदेशानुसार, श्री गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद या सण उत्सव अनुषंगाने पाच इसमास बीड तालुक्यात प्रवेश बंदीचे आदेश देण्यात आले आहे. पो.स्टे. बीड ग्रामीण येथील कलम १६३ बी.एन. एस. एस. प्रमाणे रिपोर्ट प्राप्त झाल्याने सदर रिपोर्टमधील आरोपी नामे १) शरद गणपत पवार वय ३५ वर्ष रा.नवगण राजुरी ता. जि. बीड २) तुकाराम लक्ष्मण पवार वय ४० वर्ष रा.नवगण राजुरी ता. जि. बीड ३) लक्ष्मण मरीबा वाघमारे वय ६० वर्ष रा. नवगण राजुरी ता. जि. बीड ४) विनोद आत्माराम मगर वय २९ वर्ष राहणार मंजिरी हवेली ता. जी. बीड ५) प्रवीण अशोक वीर वय ३३ वर्ष रा. करचुंडी ता.जी. बीड यांनी यापूर्वी केलेल्या गुन्हायाचे अनुषंगाने गणेश विसर्जन तसेच ईद-ए-मिलाद सणांच्या अनुषंगाने सार्वजनिक शांततेस धोका निर्माण होऊ नये म्हणून आरोपींविरुद्ध कलम १६३ बी.एन. एस. एस. प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्याने त्यांना दिनांक ०४/०९/२०२५ रोजी १८.०० वा. ते दिनांक ०७/०९/२०२५ रोजी १७.०० वाजे पावतो त्यांना बीड तालुक्यात तात्काळ प्रवेश बंदी करण्याचे आदेश मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक बीड यांनी केले आहेत.

### महादेव लांडगे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील आदर्श शिक्षक महादेव गोविंद लांडगे यांना शिक्षक दिनाचे औचित्य साधून त्यांनी केलेल्या शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीबद्दल, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा काडीवडगाव या केंद्रमार्फत त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार वितरित करण्यात आला आहे, यावेळी सन्मान चिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला, यावेळी या केंद्राचे प्रमुख प्रकाश गांडगे, केंद्रीय मुख्याध्यापक सतीश पवार, श्री कारंडे सर शेख सर, केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक वृंद आदी उपस्थित होते. यावेळी सत्काराला उत्तर देताना श्री .महादेव लांडगे सर म्हणाले की आजचा हा पुरस्कर म्हणजे आपण माझ्या पाठीवर दिलेली कौतुकाची थाप आहे.ज्ञानदानाचे हे पवित्र कार्य करत राहणार.यापुढेही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जोमाने कार्य करण्याचा शब्द यावेळी त्यांनी उपस्थितांसमोर दिला.व सर्वांचे आभार मानले. महादेव लांडगे सर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा विविध क्षेत्रातून त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### प्रवेशासाठी त्वरित संपर्क करावा

**बीड । प्रतिनिधी**

१२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अन्नतंत्र व कृषि शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया संस्थास्तरीय व्यवस्थापन कोटयातून प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी त्वरित संपर्क करावा, ज्या विद्यार्थ्यांना अन्नतंत्र बी.टेक.फूड टेक्नॉलॉजी व कृषि बी.एस्सी ऑनर्स ॲग्री, शिक्षणासाठी थेट प्रवेश घ्यावयाचा आहे, अशा विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ संलग्न असलेल्या अ दर्जा प्राप्त सौ. के. एस. के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड या ठिकाणी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरुन प्रवेशासाठी संपर्क साधावा, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी परिक्षा तसेच अभ्यासक्रमाशी संबंधित राष्ट्रीय प्रवेश परिक्षा जे.ई.ई. आणि एनईईटी दिलेल्या आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांनी सौ.के.एस. के. ( काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे त्वरित संपर्क करून आपन्ना प्रवेश निश्चित करावा. तरी विद्यार्थ्यांनी वा संधीचा लाभ घेवून प्रवेशासाठी त्वरित संपर्क साधावा आणि प्रवेश घ्यावा, असे महाविद्यालयातर्फ आवाहन करण्यात येत आहे.

### चौसाळा महाविध्यालायातील स्लोगन स्पर्धा व पोषण माह चे उद्घाटन



**बीड । प्रतिनिधी**

कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा महिला कक्ष व गृहशास्त्र विभागाच्या वतीने बेटी बचाव बेटी पढाओ स्लोगन स्पर्धा व पोषणमह चे उद्घाटन संपन्न झाले सप्टेंबर महिना हा पोषण मह म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. विद्यार्थ्यांच्या सकस आहार व त्याबद्दलची जनजागृती व्हावी त्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन कण्यात आले. या वेळी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. सुधाकर वणवे यांनी सात्विक व तामस आहार या विषयी मत व्यक्त केले तर अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. पंडित खाकरे यांनी आहाराबरोबर च व्यायाम याचे महत्व आपल्या भाषणातून मांडले तसेच स्पर्धेचा निकाल हि घोषित करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सय्यद शाहीन यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पवार सीमा यांनी केले तर महिनाभर होणार्या विविध कार्यक्रम स्पर्धा प्रदर्शन महाविध्यालयीन विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी हिमोग्लोबिन रक्त गट तपासणी असे विविध उपक्रम घेतले जाणार याची माहिती दिली. तर कार्यक्रमाचे आभार प्रा. नावेकर अरुणा यांनी केले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंखेने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनो, 14 सप्टेंबरपर्यंत ई-पीक पाहणी पूर्ण करा : जिल्हा प्रशासनाचे आवाहन



**बीड । प्रतिनिधी**

खरीप हंगाम २०२५-२६ साठी सुरू असलेली ई-पीक पाहणी मोहीम अजूनही मंद गतीने सुरू असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे . जिल्ह्यात एकूण २१ लाख ८६ हजार ५४८ प्लॉट्स पाहणीस पात्र आहेत ; त्यापैकी केवळ ४ लाख १ हजार १७८ प्लॉट्स (१८.३५ टक्के) नोंदवले गेले आहेत .

छत्रपती संभाजी नगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर , बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी वेळोवेळी शेतकऱ्यांना आणि प्रशासनाला आवाहन करून पाहणी वेगाने करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत. शेतकरी यांच्या स्तरावर नोंदणीची अंतिम तारीख १४ सप्टेंबर २०२५ असून , त्यानंतर सहायक यांच्या मार्फत नोंदणी होऊ शकते . ई-पीक पाहणी ४.०.० ॲप हे सोपे आणि उपयुक्त : हे ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध असून ते अपडेट करून घेणे आवश्यक आहे . शेतकऱ्यांनी गट क्रमांक , खाते क्रमांक व पीक तपशील भरून शेतातील फोटो अपलोड करायचा असतो . नोंदणी झाल्यानंतर पावती जतन करता येते . ही नोंदणी शेतकऱ्यांच्या पीक विमा , कर्ज , शासकीय अनुदान आणि खरेदी प्रक्रियेसाठी अत्यावश्यक आहे .

पीक पाहणी टप्प्याटप्प्याने कशी कराल : १. मोबाईलवर ई-पीक पाहणी ४.०.० ॲप डाउनलोड / अपडेट करा . २. लॉगिन करून गट क्रमांक आणि खाते क्रमांक प्रविष्ट करा . ३. पिकाचे नाव व क्षेत्रफळ भरा . ४. शेतातील थेट फोटो काढून अपलोड करा . ५. माहिती तपासून नोंदणी सबमिट करा . ६. नोंदणी पूर्ण झाल्यावर पावती डाउनलोड करून जतन करा . ▶▶ उर्वरित पान २ वर

# टेंबे चरणी पावणेदोन किलो चांदीचे दागिने अर्पण : भक्तांची लक्षणीय गर्दी



## दररोज महाप्रसाद, भाविकांनी वही, पेन देण्याचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगावचा महाराजा म्हणुन ओळख असलेल्या टेंबे गणपतीची स्थापना उत्साहात करण्यात आली असुन पहिल्याच दिवशी भाविकांनी पावणेदोन किलो चांदीचे दागिने श्रीचरणी अर्पण केले आहेत तर भक्तांची लक्षणीय उपस्थिती दिसुन येत आहे. दररोज महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे तर भाविकांनी हार, तुरे न आणता श्रीचरणी वही, पेन अर्पण करावेत असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष अनंतशास्त्री जोशी यांनी केले आहे.

गणेशोत्सव काळात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता महिलांकरीता स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे तर तीन दिवसीय गणेश यागास सुरूवात झाली आहे. गाणगापुर येथील दत्त मंदिराचा व तिरूपात बालाजीचा आकर्षक देखावा मंडळाच्या वतीने साकारण्यात आला आहे. त्याचबरोबर पाच दिवस महिलांचा भजनाचा कार्यक्रम, सामूहिक अथर्वशीर्ष पठण, पौर्णिमेला दिपोत्सव, आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर आदी उपक्रमांची रेलचेल गणेशोत्सव काळात असणार आहे. राज्यासह मराठवाड्यातुन टेंबे गणपतीच्या दर्शनाला भाविकांची मोठी रिघ आहे. स्थापनेच्या पहिल्या दिवशी गणरायाला पावणे दोन किलो चांदीचे दागिने श्रीचरणी अर्पण करण्यात आले आहेत. यामुळे मुर्तीची अधिक शोभा वाढली आहे. यामध्ये भारती व्दारकादास मुंदडा यांचे वतीने सोंड, डॉ. आर. जी. बजाज यांचे वतीने हात, सचिन बजाज, ▶ उर्वरित पान २ वर



*बीड : भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष पदी फेर निवड झाल्याबद्दल चंपावती नागरी बँकेचे ज्येष्ठ संचालक रमेश गंगाधरे यांनी नवनाथांना शिराळे पाटील यांचा भाजप कार्यालयामध्ये सत्कार केला यावेळी मधू धांडे जावळे साहेब कलीम भैया योगेश नाकाडे इत्यादी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.*

# रानडुकरांनी लिंबागणेश परीसरातील शेतकऱ्यांची उडविली झोप

## रानडुकरांचा बंदोबस्त करून नुकसान भरपाईची मागणी ; सौरकुंपणाची डॉ. श्यामाप्रसाद जन वन विकास योजना सरसकट लागू करा : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश, पिंपरनई, पोखरी (घाट), सोमनाथवाडी, इमुळुकवाडी व मसेवाडी या गावांतील शेतकऱ्यांचे पिके रानडुकरांच्या हल्ल्यामुळे मोठ्या प्रमाणावर नासाडी होत असून शेतकऱ्यांची झोप उडाली आहे. आधीच निसर्गाच्या अवकृपेमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या संकटात आणखी भर पडली आहे. वनविभागाने रानडुकरांचा बंदोबस्त करून नुकसानभरपाई द्यावी, अशी ठाम मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे. शेतकऱ्यांची मागणी-



आधीच अतिवृष्टीमुळे पिके वाया गेली आहेत. काबाडकष्टाने उभं केलेलं पीक रानडुकरांमुळे उद्ध्वस्त होत आहे. वनविभागाने याचा तातडीने बंदोबस्त करावा आणि आम्हाला नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी प्रमोद निर्मळ, बाबासाहेब निर्मळ, दिनेश आवसरे, सुदाम तागड, नामदेव आवसरे, संदिपान वायभट, देवबा गव्हाणे आदी शेतकऱ्यांनी केली आहे. डॉ. श्यामाप्रसाद जन-वन-विकास योजनेत केवळ

▶ उर्वरित पान २ वर

# जनावरं चोरांची टोळी एलसीबीकडून जेरबंद; दोन वाहनं हस्तगत

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील जनावरे चोरणाऱ्या टोळीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत पाच जनावरे व दोन वाहने हस्तगत केली आहेत. या कारवाईत एकूण चार गुन्ह्यांचा छडा लावण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर दोन आरोपी फरार आहेत.



पोलीस अधीक्षक नवनित कॉंवत यांच्या आदेशानुसार बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपासमोहीम हाती घेतली होती. दिनांक ३ सप्टेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे गांधीनगर, बीड येथील नितीन संजय जाधव याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या घरातून तीन चोरीची जनावरे जप्त करण्यात आली. चौकशीत त्याने कुंभारवाडी परिसरातून जनावरे चोरल्याची कबुली दिली. त्याच्याविरोधात पोलीस ठाणे शिरुर गुन्हे दाखल झाले आहेत.

त्यानंतर गांधीनगर येथूनच दीपक चंदु गुंजाळ यासही अटक करण्यात आली. त्याच्या ताब्यातून दोन जनावरे आणि चोरीसाठी वापरलेले वाहन जप्त करण्यात आले. त्याच्याविरोधात पोलीस ठाणे गेवराई गुन्हा दाखल झाला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक कॉंवत,अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, हवालदार अशोक दुबाले, ▶ उर्वरित पान २ वर

# अथर्वशीर्ष पठणातून सकारात्मक ऊर्जा निर्माण होते: ह.भ.प. विनायक महाराज पाटांगणकर

**बीड । प्रतिनिधी**

अथर्वशीर्षाच्या उच्चाराने वातावरणामध्ये एक वेगळीच सकारात्मक भक्तीमय ऊर्जा निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून व आपली भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन होण्याकरिता असे उपक्रम आवश्यक आहेत, असे प्रतिपादन ह.भ.प.विनायक पाटांगणकर यांनी केले. बीड येथील के. एस.के. महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण गुरुवारी (दि.४) सकाळी ११ वाजता पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे अतिथी




म्हणून ह.भ.प.विनायक महाराज पाटांगणकर हे बोलत होते. याप्रसंगी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर, बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्षा डॉ.दीपाताई क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील यांच्यासह इतरांची उपस्थिती होती. बालरंगभूमी परिषद शाखा बीड तर्फे गणेश उत्सवाचे औचित्य साधून लहान मुलांवर उत्तम संस्कार व्हावेत या उद्देशाने अथर्वशीर्ष पठणाचा उपक्रम राबविण्यात

▶ उर्वरित पान २ वर

### विविध शाळेतील २७५ विद्यार्थ्यांचा सहभाग

**बीड शहरातील संस्कार विद्यालय, चंपावती विद्यालय, सावरकर विद्यालय, यशवंत विद्यालय, रामतीर्थ कुंड विद्यालय, सरस्वती विद्यालय तेलगाव, छत्रपती शाहू विद्यालय, आयकॉन इंग्लिश स्कूल, नवगण विद्यालय, गजानन विद्यालय राजुरी आदी शाळांमधील सुमारे २७५ विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमात सहभाग नोंदवला.**